# लोणीकंद पोलिस स्टेशनची उल्लेखनिय कामगिरी..

वाघोली बुलेटीन
सामान्यांच्या हक्कासाठी लढणारे एकमेव वृत्तपत्र

## वाघोलीत गाड्यांच्या बॅटऱ्या चोरण्याचा प्रयत्न करणारा अटकेत

**वाघोली : प्रतिनिधी**

वाघोली येथील सोयरिक गार्डन मंगल कार्यालयाजवळ बॅटरी चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्यास नागरिकांच्या मदतीने लोणीकंद पोलिसांनी अटक केली असून त्याच्यावर वाघोली येथूनच टँकर चोरून नेल्याचा गुन्हा दाखल आहे.

नितीन ज्योतीराम बनसोडे असे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाघोली गावचे हद्दीत पोलीस अधिकारी व कर्मचारी रात्रीच्यावेळी पेट्रोलिंग करीत असताना फोनद्वारे माहिती मिळाली की, सोयरीक गार्डन येथील मोकळ्या पार्किंगमध्ये लावलेल्या गाड्यांच्या बॅटऱ्या एक इसम चोरण्याचा प्रयत्न करीत आहे. माहिती मिळाल्याने रात्रगस्ती करिता तैनात असलेले पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर आखेगावकर, पोलीस हवालदार बाळासाहेब सकाटे व ऋषिकेश व्यवहारे हे सदर ठिकाणी पोहचले. घडला प्रकार समजून घेऊन सदर इसमास लोकांच्या मदतीने ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव नितीन जोतिराम बनसोडे (वय ४० वर्ष) असे सांगितले. त्याचे बाबत माहिती मिळवली असता सदर इसमावर या अगोदर वाघोली येथील टँकर चोरीचा गुन्हा दाखल असेलबाबत माहिती मिळाली. तसेच त्याचे ताब्यात वायर तोडण्यासाठी लागणारी पक्कड मिळून आली. बनसोडेवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस निरीक्षक डी. एस. हाके, सुरेशकुमार राऊत (गुन्हे), पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर आखेगावकर यांनी रात्रगस्त कर्मचारी यांच्या मदतीने त्यास अटक केले आहे. सदर कारवाई डी बी पथक पोलीस हवालदार बाळासाहेब सकाटे, ऋषीकेश व्यवहारे, होम. महागडे यांनी केली.

वाढते गुन्हेगारीचे प्रमाण पाहता डी बी पथकाने प्रतिबंधात्मक कारवाईचे प्रमाण देखील वाढवले आहे. जानेवारी २०१९ पासून महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे ५ केसेस, सी आर पी सी १०९ प्रमाणे २० केसेस केल्या आहेत. गुन्हेगारीला आळा बसावा म्हणून प्रतिबंधात्मक कारवाई सुरु आहे.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
लोणीकंद पोलिस

**गुन्हेशोध पथक (क्राईम ब्रँच)**
**लोणीकंद पोलिस स्टेशन**